**वाचले :-**
१)शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दि.२ डिसेंबर १९९७
२)आदेश क्र.साप्रवि/४/कावि/७४९/२०२४, दि.१२/०३/२०२४
३) मा.उप आयुक्त,कामगार कल्याण विभाग यांचे पत्र क्र. काक/०१/कावि/५८१/२०२४ दि.०३/१२/२०२४
४) श्री.मुंढे सुग्रीव विठ्ठलराव, लिपिक यांचा दि. २८/१०/२०२४ रोजीचा विनंती अर्ज
५) मा.आयुक्त यांचेकडील दिनांक १८/१२/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/३अ/कावि/१८७/२०२४
दिनांक १९ /१२/२०२४

**विषय :- लिपिक पदाचा राजीनामा मंजूर करणेबाबत.**

**आदेश,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर जाहिरात क्र. १८४/२०२२ अन्वये लिपिक या अभिनामाची रिक्त पदे सरळसेवेने भरणेत आली होती. कर्मचारी निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार लिपिक पदावर पे लेवल एस-६ वेतनश्रेणी र.रु. १९९००-६३२०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमत: ०२ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता (Probation Period) तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देणेकामी उपरोक्त वाचले क्र. २ अन्वये आदेश निर्गत करणेत आला आहे. श्री.मुंढे सुग्रीव विठ्ठलराव, लिपिक यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे तलाठी पदावर निवड झाल्याने दि.२८/१०/२०२४ रोजीचे विनंती अर्जान्वये लेखी आगाऊ सूचना देऊन दि.०२/१२/२०२४ पासून महानगरपालिका सेवेचा राजीनामा मंजूर करणेकामी विनंती केली आहे. श्री.मुंढे सुग्रीव विठ्ठलराव यांचा मनपा सेवेतील रुजू दिनांक, राजीनामा देण्याचे कारण यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव, पदनाम | मनपा सेवेत रुजू दिनांक | मनपा सेवेचा राजीनामा अर्ज दिनांक | मनपा सेवेचा राजीनामा देण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ६ |
| १ | श्री.मुंढे सुग्रीव विठ्ठलराव | १४/०३/२०२४ | २८/१०/२०२४ | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे तलाठी पदी निवड |

श्री.मुंढे सुग्रीव विठ्ठलराव यांनी मनपा सेवेचा राजीनामा देणेकामी नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार एक महिन्याची आगाऊ सूचना दिली आहे. श्री.मुंढे सुग्रीव विठ्ठलराव यांच्याकडून उपरोक्त वाचले क्र. ३ अन्वये महानगरपालिकेस घरबांधणी कर्ज, घरदुरुस्ती कर्ज, संगणक कर्ज, वाहन कर्ज व कामगार कल्याण निधी कर्ज येणे बाकी नसून सद्यस्थितीत त्यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसून त्यांचा लिपिक पदावरील राजीनामा मंजूरीबाबत संबधित विभागप्रमुखांनी स्पष्टपणे शिफारस केली आहे.

सबब, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. २ डिसेंबर १९९७ मधील तरतुदी, विभागप्रमुखांनी केलेली शिफारस व श्री.मुंढे सुग्रीव विठ्ठलराव यांनी केलेला विनंती अर्ज विचारात घेता मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रस्तुतच्या आदेशान्वये श्री.मुंढे सुग्रीव विठ्ठलराव यांचा मनपा सेवेचा राजीनामा दि.०२/१२/२०२४ पासून मंजूर करण्यास मान्यता देत आहे. तसेच श्री.मुंढे सुग्रीव विठ्ठलराव यांचा दि.०२/१२/२०२४ पासून ते आदेशाचे तारखेपर्यंतचा कालावधी विनावेतनी करण्यात यावा. लेखापरिक्षणार्थ अन्य काही येणे रक्कम निघाल्यास ती श्री.मुंढे सुग्रीव विठ्ठलराव यांनी भरणे बंधनकारक राहील.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.मुंढे सुग्रीव विठ्ठलराव यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

सही/-
(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रति —
श्री.मुंढे सुग्रीव विठ्ठलराव, लिपिक
प्रत -१. लेखा विभाग २. लेखापरीक्षण विभाग ३. दूरसंचार विभाग ४. माहिती व जनसंपर्क विभाग
५. कामगार कल्याण विभाग ६. माहिती तंत्रज्ञान विभाग ७. साप्रवि टेबल क्र. ७,८,१०,११,१२,१४,
८.संगणक कक्ष साप्रवि

उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८